30 SEP 2026

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कविता ही जगण्याचे संवेदनशील प्रतिबिंब

## वसंत आबाजी डहाके : प्रभा गणोरकर, रवी कोरडे यांना काळसेकर पुरस्कार प्रदान

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २९ : कविता ही केवळ व्यक्तिगत नसते, तर तिच्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय वास्तवाचे अनेक पदर सामावलेले असतात. आजच्या मराठी कवितेत विस्थापन, बदलती कृषी संस्कृती, पर्यावरणाचा ऱ्हास, स्त्रीचे अस्तित्व आणि मानवी जगण्यातील संघर्ष यांचे संवेदनशील प्रतिबिंब उमटत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या २०२६ च्या काळसेकर पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. राजन गवस, तर आदित्य काळसेकर प्रमुख उपस्थित होते. सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार हे अनुक्रमे ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर आणि कवी रवी कोरडे यांना प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप अनुक्रमे २१ हजार रुपये आणि १० हजार रुपये आणि शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह असे आहे.

डहाके यांनी कोल्हापूर आणि विद्यापीठाशी असलेल्या ऋणानुबंधांसह गोविंद पानसरे, डॉ. चंद्रशेखर जहागीरदार, सतीश काळसेकर, प्रकाश विश्वासराव यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रत्येक कवीची कविता एकाच वेळी व्यक्तिगत आणि सामाजिक असते. प्रेमाचा कवीही समाजाविषयी तितक्याच तीव्रतेने लिहू शकतो, कारण प्रेमातूनच जगाचा कळवळा आणि अन्यायाविषयीची संवेदना निर्माण होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

'काळसेकर पुरस्कार' हा मराठीतील महत्त्वाच्या कवींच्या सन्मान, साहित्य परंपरेच्या जतनाची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. गणोरकर यांनी कविता आणि समीक्षा या दोन्ही क्षेत्रांत मूल्यनिष्ठ, निर्भीड आणि संवेदनशील लेखनातून मराठी साहित्यविश्व समृद्ध केले आहे. कोरडे यांच्या कवितेत कृषी संस्कृती, ग्रामीण जीवन आणि मातीशी असलेले नाते वेगळ्या जाणिवेने व्यक्त झाले असल्याचे डॉ. गवस यांनी सांगितले.

कविता ननावरे आणि प्रांजली क्षीरसागर यांनी गणोरकर आणि कोरडे यांच्या निवडक कवितांचे अभिवाचन केले. यावेळी गौतमीपुत्र कांबळे, प्रभंजन माने, आर. जी. कुलकर्णी, अवनीश पाटील, सुधीर पोटे, काळसेकर कुटुंबीय उपस्थित होते. मराठी अधिविभागाचे प्रमुख रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठ : सतीश काळसेकर काव्य पुरस्कार प्रभा गणोरकर यांना मंगळवारी प्रदान करताना डॉ. राजन गवस आणि वसंत आबाजी डहाके. यावेळी शेजारी डावीकडून रणधीर शिंदे, ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार विजेते रवी कोरडे आणि आदित्य काळसेकर.

30 SEP 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कविता ही समाजाच्या जगण्याचे प्रतिबिंब

## ज्येष्ठ साहित्यिक वसंत डहाके यांचे प्रतिपादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

जनप्रवासकविता ही केवळ व्यक्तीगत नसते, तर तिच्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय वास्तवाचे अनेक पदर सामावलेले असतात. आजच्या मराठी कवितेत विस्थापन, बदलती कृषी संस्कृती, पर्यावरणाचा ऱ्हास, स्त्रीचे अस्तित्व आणि मानवी जगण्यातील संघर्ष यांचे संवेदनशील प्रतिबिंब उमटत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांनी येथे केले.



**विद्यापीठाचा सतीश काळसेकर काव्य पुरस्कार प्रभा गणोरकर करताना डॉ. राजन गवस, वसंत आबाजी डहाके. सोबत रणधीर शिंदे, ऋत्विज काळसेकर, काव्य पुरस्कार विजेते रवी कोरडे, आदित्य काळसेकर.**

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०२६ च्या काळसेकर पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस अध्यक्षस्थानी होते, तर आदित्य काळसेकर प्रमुख उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारे २०२६ सालचे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार हे अनुक्रमे ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर आणि कवी रवी कोरडे यांना प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरुप अनुक्रमे २१ हजार रुपये व १० हजार रुपये आणि शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह असे आहे.

डहाके म्हणाले, त्यांच्या कवितेत स्त्रीजीवन, मानवी अस्तित्व, प्रेम, पर्यावरण आणि सामाजिक वास्तवाचे विविध पैलू व्यक्त होत असून, व्यक्तिगत अनुभवांच्या पलीकडे जाऊन अनेक स्त्रियांचे जगणे त्यात सामावले आहे. त्यांच्या कवितेतील 'झाड' आणि 'प्रवास' हे महत्त्वाचे आदिबंध असून सर्जनाची प्रेरणा आणि नष्ट होण्याची जाणीव यांचा संघर्षही त्यांच्या कवितेत दिसतो, असे त्यांनी सांगितले. "प्रत्येक कवीची कविता एकाच वेळी व्यक्तिगत आणि सामाजिक असते." प्रेमाचा कवीही समाजाविषयी तितक्याच तीव्रतेने लिहू शकतो, कारण प्रेमातूनच जगाचा कळवळा आणि अन्यायाविषयीची संवेदना निर्माण होते. रवी कोरडे यांच्या कवितेची मुळे ग्रामीण जीवन, जमीन आणि कृषी संस्कृतीत रुजलेली आहेत. विकासाच्या प्रक्रियेत शेतजमिनी जाणे, जंगलांचा ऱ्हास, गावांचे विस्थापन आणि पर्यावरणाचे प्रश्न यांचे प्रभावी प्रतिबिंब त्यांच्या कवितेत उमटते. त्यामुळे मराठी कवितेतील नवी पिढी ही 'विस्थापितांची पिढी' असल्याचे सांगितले. डॉ. राजन गवस म्हणाले, काळसेकर पुरस्कार हा मराठीतील महत्त्वाच्या कवींच्या सन्मानाची आणि साहित्यपरंपरेच्या जतनाची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. प्रभा गणोरकर यांनी कविता आणि समीक्षा या दोन्ही क्षेत्रांत मूल्यनिष्ठ, निर्भीड आणि संवेदनशील लेखनातून मराठी साहित्यविश्व समृद्ध केले आहे. रवी कोरडे यांच्या कवितेत कृषी संस्कृती, ग्रामीण जीवन आणि मातीशी असलेले नाते वेगळ्या जाणिवेने व्यक्त झाले

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कविता ननावरे आणि प्रांजली क्षीरसागर यांनी त्यांच्या निवडक कवितांचे अभिवाचन केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. गौतमीपुत्र कांबळे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. आर.जी. कुलकर्णी, डॉ. अवनीश पाटील, सुधीर पोटे, काळसेकर कुटुंबिय यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

30 SEP 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कविता समाजाच्या जगण्याचे प्रतिबिंब

## वसंत आबाजी डहाके; प्रभा गणोरकर, रवी कोरडे यांना काळसेकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कविता ही केवळ व्यक्तिगत अभिव्यक्ती नसून तिच्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय वास्तवाचे अनेक पदर सामावलेले असतात. आजच्या मराठी कवितेत विस्थापन, बदलती कृषी संस्कृती, पर्यावरणाचा ऱ्हास, स्त्रीचे अस्तित्व व मानवी संघर्ष यांचे संवेदनशील प्रतिबिंब उमटत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा सतीश काळसेकर काव्य पुरस्कार प्रभा गणोरकर यांना प्रदान करताना डॉ. राजन गवस, वसंत आबाजी डहाके. सोबत डॉ. रणधीर शिंदे, ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार विजेते रवी कोरडे, आदित्य काळसेकर. (छाया : नाज ट्रेनर)**

शिवाजी विद्यापीठाच्या २०२६ च्या काळसेकर पुरस्कार वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस होते. याप्रसंगी सतीश काळसेकर काव्य पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना, तर ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार कवी रवी कोरडे यांना प्रदान करण्यात आला. प्रभा गणोरकर यांच्या कवितेत स्त्रीजीवन, मानवी अस्तित्व, प्रेम, पर्यावरण व सामाजिक वास्तवाचे विविध पैलू व्यक्त होत आहे. त्यांच्या अनुभवांमधून व्यापक स्त्रीजीवनाचे चित्र उभे राहते, असे डहाके यांनी सांगितले. रवी कोरडे यांच्या कवितेची मुळे ग्रामीण जीवन, जमीन व कृषी संस्कृतीत रुजली असून, विस्थापन, जंगलांचा ऱ्हास आणि पर्यावरणीय प्रश्नांचे प्रभावी चित्रण त्यांच्या कवितेत असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. राजन गवस यांनी काळसेकर पुरस्कार हा मराठी साहित्य परंपरेच्या जतनाची महत्त्वपूर्ण प्रक्रिया असल्याचे सांगितले. यावेळी दोन्ही पुरस्कारार्थींनी कृतज्ञता व्यक्त केली. कविता ननावरे, प्रांजली क्षीरसागर यांनी निवडक कवितांचे अभिवाचन केले. यावेळी प्रा. गौतमीपुत्र कांबळे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. अवनीश पाटील, सुधीर पोटे, काळसेकर कुटुंबीय उपस्थित होते. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

30 SEP 2026
सिंधुदुर्ग समाचार

# महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात कार्यक्रम होईल. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित केला आहे.

विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. राजनिश कामत अध्यक्षस्थानी असतील.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी' युट्यूब वाहिनीवरुन 'गाथा स्वातंत्र्यसैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चालविली. या मालिकेतील स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरुपात संपादन करण्यात आले आहे. डॉ. अविनाश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे. नव्या पिढीला स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. अरुण भोसले, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अविनाश पाटील तसेच कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. इतिहास, स्वातंत्र्य चळवळ विषयांत रस असलेल्या नागरिकांनी, विद्यार्थी, संशोधक आणि विद्यापीठातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

3 0 SEP 2026
तरुण भारत

# 'गाथा स्वातंत्र्यसैनिकांची'चे उद्या प्रकाशन

| प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचा प्रकाशन गुरुवार, दि. १रोजी करण्यात येणार आहे. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित केला आहे. माजी कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. राजनिश कामत अध्यक्षस्थानी असतील.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी' युट्यूब वाहिनीवरुन 'गाथा स्वातंत्र्यसैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर चालविली. यातील स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरुपात संपादन करण्यात आले आहे. डॉ. अविनाश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे. कार्यक्रमास प्र–कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, प्रा. अरुण भोसले, डॉ. अविनाश पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

3 0 SEP 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवातून सामाजिक एकात्मतेला बळ

## प्रा. डॉ. गुरव : जयसिंगपूर कॉलेजमध्ये युवा महोत्सवाचा प्रारंभ



**जयसिंगपूर** : युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी मान्यवर.

जयसिंगपूर, ता. २९ : युवा महोत्सवाच्या माध्यमातून युवकांचा सक्रिय सहभाग वाढवून त्यांच्यातील नेतृत्वगुणांना चालना देता येते. विविध कला, संस्कृती आणि परंपरांच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक एकात्मता अधिक दृढ करण्यास मदत होते, असे प्रतिपादन व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले.

जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूरमध्ये आयोजित शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर जिल्हास्तरीय ४६ व्या युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. सुभाष अडदंडे होते. व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. बी. एस. सातपुते, विद्यार्थी विकास विभागाचे प्र-संचालक डॉ. एस. जी. घाणे, डॉ. महावीर अक्कोळे, पद्माकर पाटील, प्राचार्य डॉ. एस. ए. मांजरे आदी उपस्थित होते.

डॉ. एस. जी. घाणे यांनी युवा महोत्सव हा युवकांच्या कलागुणांना वाव देणारा तसेच मनोरंजनासोबतच विविध कलाविष्कारांचा अनुभव देणारा उत्सव असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. अतिग्रे यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत प्राचार्य डॉ. सूरत मांजरे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. संदीप तापकीर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. व्ही. व्ही. चौगुले यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. एस. डी. चौगुले व प्रा. अंजना चावरे यांनी केले, तर प्रा. डॉ. टी. जी. घाटगे यांनी आभार मानले.

3 0 SEP 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकनृत्याची झलक



जयसिंगपूर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाचा ४६ वा एकदिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव मंगळवारी रात्री उशिरापर्यंत सुरू होता. या युवा महोत्सवात लोकनृत्य कला सादर करण्यात आली.

30 SEP 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जयसिंगपूर कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्घाटन

**जनप्रवास : जयसिंगपूर**

येथील जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर जिल्हास्तरीय ४६ व्या युवा महोत्सवाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुभाष अडदंडे होते.

स्वागत प्राचार्य डॉ. सुरत मांजरे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. संदीप तापकीर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. व्ही. व्ही. चौगुले यांनी करून दिला. याप्रसंगी प्रा. डॉ. गुरव, विद्यार्थी विकास विभागाचे प्र-संचालक डॉ. एस. जी. घाणे, प्रा. डॉ. अतिग्रे यांची यावेळी भाषणे झाली.



**जयसिंगपूर : येथे शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.**

यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. बी. एस. सातपुते, डॉ. महावीर अक्कोळे, पद्माकर पाटील, प्राचार्य डॉ. एस. ए. मांजरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. एस. डी. चौगुले व प्रा. अंजना चावरे यांनी केले, तर प्रा. डॉ. टी. जी. घाटगे यांनी आभार मानले.

यावेळी शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव संयोजन समितीचे सदस्य, महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य, कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थी, प्राध्यापक तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

30 SEP 2026

पुण्यनगरी

# विमानतळावर स्वागत

**कोल्हापूर :** राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे विमानतळावर आगमन झाले. यावेळी त्यांचे प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी स्वागत केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन, शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, करवीर उपविभागीय अधिकारी मौसमी चौगुले उपस्थित होते. विमानतळावर आगमन होताच राज्यपालांना पोलीस दलाच्या वतीने 'गार्ड ऑफ ऑनर' (सलामी) देऊन मानवंदना देण्यात आली.

30 SEP 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्हा जागतिक नकाशावर आणा

## राज्यपाल : कोल्हापूर महोत्सवासारख्या उपक्रमातून ब्रँडिंग करा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : कोल्हापूर जिल्हा अप्रतिम निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. विपुल निसर्गसंपदा आहे. तीर्थस्थळे, क्रीडा, व्यापार, उद्योग अशी गौरवशाली परंपरा आहे. अशा कोल्हापूरला जागतिक नकाशावर आणण्यासाठी ब्रँडिंग आवश्यक आहे. कोल्हापूरचे समग्र, एकात्मिक ब्रँडिंग करण्यासाठी कोल्हापूर महोत्सवासारखे उपक्रम राबवावेत, अशी सूचना राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज येथे केली.

त्यांनी जिल्ह्यातील विविध विकास प्रकल्पांसह अन्य योजनांची जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती घेतली. यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी विमानतळावर राज्यपालांचे स्वागत केले. यावेळी पोलिस दलाने त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन मानवंदना दिली. त्यानंतर राज्यपाल डॉ. वर्मा यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. बैठकीला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, कुलगुरू डॉ. आर. के. कामत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, राज्यपालांचे परिसहायक नवदीप अगरवाल, इचलकरंजी महापालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल वर्मा म्हणाले, "कोल्हापूरची कुस्ती आणि कबड्डी प्रसिद्ध आहे. येथील वने समृद्ध आहेत. निसर्ग सौंदर्याने हा जिल्हा नटलेला आहे. इचलकरंजीचा कापड उद्योग, हुपरीचा चांदी उद्योग सातासमुद्रापार पोहोचलेला आहे. अंबाबाई, जोतिबा यासारखी तीर्थस्थळे आहेत. कोल्हापुरी गूळ, कोल्हापुरी चप्पल यासह अनेक कृषी उत्पादने, हस्तकलांचा मोठा लौकिक आहे."

यावेळी राज्यपालांनी पिंक रूम उपक्रमाचे कौतुक केले. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यात उभी झालेली ट्रान्सजेंडर यांची रेस्क्यू टीम या संकल्पनेचेही कौतुक केले.



कोल्हापूर : राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वागत करताना जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड.

### नशामुक्तीसाठी समाजाने पुढाकार घ्यावा

राज्यपाल म्हणाले, "सुदृढ समाजासाठी नशामुक्त तरुणाई गरजेची आहे. व्यसनमुक्ती केवळ कायदे, पोलिस प्रशासन किंवा शासकीय उपाययोजना यांच्यापुरती मर्यादित ठेवू नका. निरोगी आणि व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा, कुटुंबाचा आणि समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. नशामुक्त पिढी घडविणे आज फार मोठे आव्हान आहे. खेळाडू, कलाकार, प्रभावी व्यक्तिमत्त्वांनीही या कार्यात पुढकार घेतला पाहिजे.'

30 SEP 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढवा

## राज्यपाल जिष्णू देव वर्मा; कोल्हापूरला जागतिक नकाशावर प्रमोट करण्यासाठी ब्रँडिंग आवश्यक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कुस्ती, कबड्डी सारखे खेळ, निसर्ग सौंदर्य, श्री अंबाबाई, श्री जोतिबा यासारखी तीर्थस्थळे, इचलकरंजीचा कापड उद्योग, हुपरीचा चांदी उद्योग, कोल्हापुरी गूळ, चप्पल यासह अनेक कृषी उत्पादने, हस्तकला असा मोठा लौकिक असलेल्या कोल्हापूरला जागतिक नकाशावर प्रमोट करण्यासाठी त्याचे ब्रँण्डिंग आवश्यक आहे. त्यासाठी विमानतळाची कनेक्टिव्हिटी अधिक वाढवा, अशी सूचना राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी मंगळवारी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात राज्यपाल वर्मा यांना जिल्ह्यातील विविध विकास प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी वर्मा म्हणाले, सुदृढ समाज आणि निकोप समाजमन घडविण्यासाठी नशा मुक्त भारत आणि टीबी मुक्त भारत ही अभियाने प्रशासनाने अत्यंत व्यापकपणे राबवावी. व्यसनमुक्ती केवळ कायदे, पोलिस प्रशासन अथवा शासकीय उपाययोजनांपुरती मर्यादित नसून, निरोगी आणि व्यसनमुक्त समाज घडवण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा, कुटुंबाचा आणि समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. नशा मुक्त पिढी घडविणे हे मोठे आव्हान आहे. समाजातील खेळाडू, कलाकार, प्रभावी व्यक्तिमत्वांनी जनजागृती व प्रबोधनासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.



**कोल्हापूर : जिल्हाधिकारी कार्यालयात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांना जिल्ह्यातील विविध विकास प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. तत्पूर्वी जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, सचिव डॉ. प्रशांत नारनवरे आदी.**

जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी महामार्ग विकास, राज्यस्तरीय रस्ते विकास, विमानतळ विस्तार, सांस्कृतिक वारसा आणि तीर्थक्षेत्र विकास, श्री महालक्ष्मी अंबाबाई विकास आराखडा, श्री क्षेत्र जोतिबा विकास आराखडा, शिक्षण, संशोधन आणि प्रशासन यामधील विविध उपक्रम, वैद्यकीय पायाभूत सुविधा, पूर नियंत्रण आणि प्रदूषण मुक्तीसाठीचे प्रकल्प, प्रस्तावित कोल्हापूर आयटी पार्क, पवणार ते पत्रादेवी शक्तीपीठ महामार्ग, विभागीय क्रीडा संकुल आधुनिकीकरण आणि विस्तार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, रिंग रोड व चार पदरी उन्नत मार्गीका, वैभववाडी-कोल्हापूर रेल्वे मार्ग प्रकल्प आदींचे सादरीकरण केले.

महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड यांनी संगीत सूर्य केशवराव भोसले नाट्यगृह, राजर्षी शाहू खासबाग मैदान, राजर्षी शाहू महाराज समाधी स्थळ, मेकॅनिकल कार पार्किंग, रंकाळा म्युझिकल फाऊंटन, ॲस्ट्रो टर्फ हॉकी स्टेडियम, श्री अंबाबाई मंदिर पार्किंग आणि भक्तनिवास यासह शहराच्या विविध सौंदर्यकरणाचे उपक्रम, कोल्हापूर इलेव्हेटर कॉरिडॉर, घनकचरा व्यवस्थापन आणि प्रक्रिया प्रकल्प, जीआयएसबेस्ड मालमत्ता सर्वे आदी विषयांबाबतचे सादरीकरणी केले. प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील जिल्हा परिषदेचे विविध उपक्रम, पिजीआय ग्रेडिंग, समृद्ध शाळा पिंक रूम उपक्रम याबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादरीकरण केले.

यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू राजनिश कामत, राज्यपालांचे परिसहायक नवदीप अगरवाल, इचलकरंजी महापालिका आयुक्त पल्लवी पाटील आदींसह प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

### वर्मा यांनी विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी साधला संवाद

शासकीय विश्रामगृह येथे वर्मा यांनी जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या मान्यवरांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी डॉ. डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उद्योजक भरत जाधव, सुरेंद्र जैन, नीरज झंवर, मोहन कुशिरे, राजीव पाटील, भरत जाधव, वर्धन वडगावे, आर्किटेक्ट असोसिएशनचे अजय कोराने, डॉ. अशोक भूपाळी, डॉ. ए. बी. पाटील, डॉ. सुरज पवार, डॉ. सतीश पत्की, सीए आशिष सेवेकरी, ॲड. श्रीकृष्ण गनबावले, ॲड. राजेंद्र मंडलिक, इतिहास संशोधक जे. के. पवार, मंजुश्री पवार, सागर पाटील आदींसह दैनिक 'पुढारी'चे कार्यकारी संपादक विजय जाधव, नेमबाज तेजस्विनी सावंत, सोनम म्हस्कर, खेळाडू अनिल पवार, मयुरी आळवेकर, कारागीर शुभम सातपूते आदींनी कोल्हापूरसाठी आवश्यक पायाभूत सुविधा तसेच शासनाकडून असणाऱ्या अपेक्षा व्यक्त केल्या.

30 SEP 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एक होती नकुशी!



ज्ञान-विज्ञान
डॉ. व्ही. एन. शिंदे
संपर्क : ९६७३७८४४००

**परदेशातही मुलालाच कुलदीपक मानले जात असे. आपल्याकडे नको असतानाही मुलगी जन्मली तर तिचे 'नकुशी' असे नाव ठेवले जायचे. विदेशात, त्यातही अमेरिकेत एका सुशिक्षित घरात जन्मलेल्या मुलीचे नशीबही असेच होते. नको असताना जन्माला आली, म्हणून तिचे नाव ठेवण्यात आले बार्बारा, म्हणजेच नकुशी.**

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

तिचे घरात कोणी लाड करत नसे. तिच्याकडे फारसे कोणी लक्षही देत नसे. घरात आहे म्हणून खायला-प्यायला दिले जायचे. तिच्या पाठीवर घराचा कुलदीपक जन्मला, तरी तिच्याशी वागणे तेच राहिले. मात्र, याच नकुशीने आपल्या ज्ञानाने आणि कर्तृत्वाने घराण्याचे नाव अजरामर केले.

बार्बारा मॅक्लिटॉक यांचा जन्म १६ जून १९०२ रोजी अमेरिकेतील हार्टफोर्ड भागात झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते. बार्बारांचे खरे नाव इलेनॉर होते. मात्र, घरात सलग तिसऱ्या मुलीच्या रूपात त्यांचा जन्म झाल्याने सर्वांनाच त्या नको होत्या, म्हणूनच त्यांना सर्वजण बार्बारा म्हणजेच नकुशी म्हणू लागले. शाळेतही हेच नाव नोंदवले. तिला तिच्या मामाकडे पाठवून देण्यात आले. त्यांचे मामा मासेमारीचा व्यवसाय करत. बार्बारा त्यांना मासे विकण्यास मदत करत, त्यामुळे त्या मुलाप्रमाणे वागू लागल्या. पुढे त्यांच्या वडिलांनी ब्रुकलिन भागात स्थलांतर केले. तेथे बार्बारांना बोलावून घेण्यात आले. तिथे त्यांची शाळा सुरू झाली आणि पहिल्या महायुद्धाचा भडका उडाला. वडिलांनी सैनिकांची सेवा करण्यासाठी फ्रान्सला जाण्याचा निर्णय घेतला. वडील तिकडे गेले तरी कुटुंब अमेरिकेतच राहिले. त्यांनी इरॅस्मस हॉल स्कूलमधून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांना महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा होता, मात्र महाविद्यालयात प्रवेश घेतला तर लग्नाचे वय निघून जाईल, म्हणून आईने त्यांच्या महाविद्यालयीन प्रवेशास विरोध केला. दरम्यान युद्ध संपले, वडील फ्रान्समधून परत आले. त्यांनी मात्र बार्बारांना पुढे शिक्षण घेण्यास परवानगी दिली आणि त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू झाले.

घरातील वातावरणामुळे, घरातील त्यांच्याशी असलेल्या वागण्यामुळे बार्बारा यांचे महाविद्यालयातील वागणे चांगले नव्हते. धूम्रपान करणे, मोठ्याने हसणे, मुलांसारखा गोंधळ घालणे अशा अनेक गोष्टी त्या करत. मात्र, पुढे त्यांच्याच लक्षात आले की असे वागणे त्यांच्या ज्ञान मिळवण्याच्या मार्गातील मोठा अडथळा आहे. त्यांनी स्वतःच अशा सर्व गोष्टींचा त्याग केला व त्या अभ्यास करू लागल्या. १९२३ मध्ये त्यांनी पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला. महाविद्यालयात त्यांना वनस्पतीशास्त्रात रूची निर्माण झाली. त्यातही जनुकशास्त्राने त्या प्रभावित झाल्या. बार्बारा यांच्यापूर्वी काही संशोधकांनी मक्यावर संशोधन सुरू केले होते. बार्बारा त्या गटात सहभागी झाल्या. त्या काळात त्यांनी जनुकशास्त्रात संशोधन केले, मात्र कार्नेल विद्यापीठाने त्यांना जनुकशास्त्रातील पदवी प्रदान केली नाही. त्याकाळी महिलांनी जनुकशास्त्रावर संशोधन करण्यास कार्नेल विद्यापीठात बंदी होती. त्यांना १९२५ मध्ये एम. एस. आणि १९२७ मध्ये वनस्पतीशास्त्रातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

शिक्षण पूर्ण होताच त्यांची निदेशक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांना आता संशोधनासाठी कमी वेळ मिळू लागला, तरीही त्यांनी संशोधन नेटाने सुरू ठेवले. त्यांच्या संशोधनाचे महत्त्व कार्नेल विद्यापीठातील प्राध्यापक मार्कस ऱ्होडस यांच्या लक्षात आले. त्यांना जनुकशास्त्रातील ज्या प्रयोगात यश मिळत नव्हते, तेच प्रयोग बार्बारा मात्र यशस्वीरित्या करत होत्या. ऱ्होडस यांनी बार्बारा यांच्या प्रयोगात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बार्बारांचे शोधनिबंध प्रसिद्ध होऊ लागले. प्रा. शार्प यांनी बार्बारांच्या संशोधनाची दखल आपल्या पुस्तकात घेतली तरीही बार्बारांच्या कार्याची दखल कार्नेल विद्यापीठाने घेतली नाही. त्यांना प्राध्यापक पद न देता निदेशक पदावरच ठेवले. बार्बारा मात्र अन्यायाकडे लक्ष न देता आपल्या संशोधनात मग्न होत्या. बार्बारा अतिशय सूक्ष्म पद्धतीने आपल्या प्रयोगाच्या नोंदी ठेवत. प्रयोगशाळा स्वच्छ ठेवत. शिस्त पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या मुक्तहस्ताने ज्ञान देत. प्रयोगशाळेतील शिस्त त्या घरातही पाळत. या शिस्तबद्धतपणामुळेच त्यांना प्रयोगातून अचूक निर्णय मिळत होते. यातून त्यांचा आत्मविश्वास वाढला. संशोधन करायचे तर आपण विवाहाचे बंधन स्वीकारायचे नाही असे त्यांनी ठरवले आणि आयुष्यभर अविवाहित राहिल्या. संध्याकाळी काही काळ टेनिस खेळणे सोडले तर इतर सर्व वेळ त्यांच्या मनामध्ये संशोधनाचे विचार सुरू असत. त्यांनी जनुकशास्त्रातच संशोधन करायचे ठरवले, मात्र ते विद्यापीठाला रूचणारे नव्हते; त्यामुळे त्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणाजवळची जमीन प्रयोगासाठी देण्यात आली नाही. त्याऐवजी तेथून दूर टेकडीवरची जमीन देण्यात आली. तेथे लावलेल्या रोपांना घालण्यासाठी पाणीही उपलब्ध नव्हते, मात्र बार्बारा हार मानणाऱ्या नव्हत्या.

त्यांनी टेकडीच्या माथ्यावर मक्याची शेती केली. तेथे त्या पाणी वाहून नेत. जास्त पाऊस पडला तर रात्रीच्या वेळी मोटारीच्या प्रकाशात वाहून जाणारी रोपे अडवून त्या रोपांना पुन्हा लावत. अशा खडतर परिस्थितीत संशोधन करून त्या आपले शोधनिबंध प्रकाशित करत राहिल्या. त्या काळात हॅरियट नावाची कष्टाळू विद्यार्थिनी त्यांना भेटली. तिच्यासमवेत प्रयोग करून त्यांनी अनेक महत्त्वाचे निष्कर्ष काढले. नवे वाण तयार करण्याचे तंत्र त्यांना सापडले. मात्र, विद्यापीठातून मिळणारी निराशाजनक वागणूक पाहून त्यांनी आपले संशोधन प्रकाशित केले नाही. याचदरम्यान कोलंबिया विद्यापीठातील प्राध्यापक मॉर्गन कार्नेल विद्यापीठात आले होते. त्यांनी बार्बारांचे संशोधन पाहिले. बार्बारांच्या संशोधनाने ते खूपच प्रभावित झाले. त्यांनी बार्बारांना आपले संशोधन तत्काळ प्रसिद्ध करण्यास भाग पाडले. त्यातील १९३१ मध्ये प्रकाशित झालेला शोधनिबंध खूपच महत्त्वाचा ठरला. मक्याचे संकरित वाण तयार करताना कालपरत्वे होणारे बदल या शोधनिबंधात मांडण्यात आले होते. बार्बारा यांनी मॉर्गन यांचे म्हणणे ऐकले नसते तर या शोधाचे श्रेय कर्ट स्टर्न यांना मिळाले असते, कारण बार्बारा यांचे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर काही दिवसांतच स्टर्न यांचे याच विषयावरचे संशोधन प्रसिद्ध झाले.

जगभरातून बार्बारा यांच्यावर कौतुकाचा वर्षाव सुरू झाला. मात्र, कार्नेल विद्यापीठातून त्यांचा वारंवार अपमान होत राहिला. त्यांच्या कार्याची कसलीच दखल घेतली जात नव्हती. त्यांना साधे प्राध्यापक पदही देण्यात आले नव्हते. त्या काही काळ खूप निराश झाल्या. अखेर त्यांनी कार्नेल विद्यापीठ सोडून मिसौरी विद्यापीठात संशोधन सुरू केले. तेथे केलेल्या संशोधनातून त्यांनी संकरित वाण तयार केले. त्यांना अनेक शिष्यवृत्त्या प्रदान करण्यात आल्या. घरापासून विद्यापीठापर्यंतची नकुशी सेलिब्रिटी झाली... केवळ ज्ञानाच्या जोरावर! अखेर कार्नेल विद्यापीठ झुकले आणि त्यांना प्राध्यापक पदावर सन्मानाने नियुक्त केले.